# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१३/०५/२०१८

## दि.१२/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ३३०/१८,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६,३०७,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अजय जालींदर जाधव,वय-२८,रा.मिलींदनगर,पिपरी,पुणे |
| **आरोपी** | १.शाहरुख युसुफ खान,वय-२६,रा.काळाखडक वसाहत,वाकड,पुणे (अटक) व इतर ५ ते ६ इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०५/२०१८ रोजी २०/३० वा.आंबिका शुजचे दुकानासमोर डिलक्स चौक,पिंपरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र धर्मेश पाटील याचेसह मोटार सायकलवरुन नमुद ठिकाणा वरुन जात असताना,त्यांची मोटार सायकलचा नमुद इसमाचे कारला आडवी आल्याचे कारणावरून त्यांनी फिर्यादीस आमची गाडी दिसत नाही का असे म्हणुन त्यांना शिवीगाळ करुन,बेकायदेशीर जमाव जमवुन,लोंखडी कोयत्याने डोक्यात,पाठीवर,खांदयावर व हातावर मारुन,त्यांना गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी यांचे मित्रास हाताने मारहाण करुन त्यांना रिव्हॉलवरचा धाक दाखवुन धमकी देवुन,सदर ठिकाणी दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.झेज.मुंढे ८८८८८२४१७६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ३३७/१८,भादविक ३०७,३२४,१४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,३२३,४२७ |
| **फिर्यादी** | शनेश पाखरे,वय-२१ वर्ष,रा.लोंढे वाडा,भोसरी,पुणे |
| **आरोपी** | एकुण सहा इसम (अटकनाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०५/२०१८ रोजी २२/१५ वा.चे सुमारास पी.सी.एम.सी.चौक,भोसरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र १.मयुर घोलप २.मालविन डिसोझा यांचेसह बोलत उभे असताना,यातील नमुद इसम अल्पेश मुरकर याने एक आठवडयापुर्वी वडापाव खाल्यावर फिर्यादी यांनी त्यास पैसे मागीतल्याचे कारणावरुन,फिर्यादी यांना शिवीगाळ करून त्यांना मारण्याची धमकी दिली होती. त्या वादाचा राग मनात धरून इतर इसमांनी बेकायदेशीर जमाव जमवुन दुचाकीवरून नमुद ठिकाणी येवुन,फिर्यादी यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करीत असताना,मयुर व मालविन हे मध्ये पडले असता,अल्पेश मुरकर याने कोयता बाहेर काढुन,मालविन डिसोझा याचेवर जीवे मारण्याचे इराद्याने वार केले. तसेच इतरांनी लाकडी दांडक्याने फिर्यादी १.मालविन २.मयुर यांस मारहाण करून,मयुर घोलप याची गाडी खाली पाडुन तीची मोडतोड केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.झेड.मुंढे ८८८८८२४१७६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १२७/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३५,रा.च-होली,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०५/१८ रोजी १८/२५ वा. काळजेवाडी ते ताजणेमळा च-होली,ता.हवेली,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया लग्न कार्यक्रमासाठी मोटार सायकलवरून जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याच राणीहार व गंठण १ लाख ५० हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गिरी ९८२२३८००९० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे २३६/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | संदेश खांडेकर,वय-२८ वर्ष,रा. व्दारा कालिदास दिवेकर,तनिष्क बिल्डींग,फ्लॅट नं.४०३, तुळजाभवानी नगर,पिंपळे-गुरव,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०५/२०१८ रोजी सकाळी ०९/०० ते १८/०० वा. चे दरम्यान व्दारा कालिदास दिवेकर, तनिष्क बिल्डींग,फ्लॅट नं.४०३, तुळजाभवानी नगर,पिंपळे-गुरव,पुणे येथील फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख १० हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण ४,४०,०००/- रु किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, बी.ए.ननवरे ८२७५४६२४९५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ४२९/१८,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | सत्यनारायण गट्टपल्ली,वय-५० वर्ष,रा.जि.गंटुर आंध्र प्रदेश |
| **आरोपी** | सिल्वर स्पोर्ट क्लब,वाकड,पुणेचे व्यवस्थापक व इतर जबाबदार व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०५/२०१८ रोजी ०८/३० वा. सिल्वर स्पोर्ट क्लब,वाकड,पुणे येथील स्वीमिंग पुल मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा भार्गव हा सिल्वर स्पोर्ट क्लब,वाकड,पुणे येथील स्वीमिंग पुल मध्ये येथे पोहत असताना, स्विमींग पुलमध्ये पोहण्यासाठी आलेल्या मुलांचे सुरक्षिततेच्या व जिवीताचे दृष्टीकोनातुन त्यांना लाईफ गार्ड नेमण्याची व योग्य ती साधन सामुग्री ठेवण्याची जबाबदारी सिल्वर स्पोर्ट क्लबचे व्यवस्थापक व इतर जबाबदार व्यक्ती यांचेकडे असताना त्यांनी त्यामध्ये हलगर्जी व निष्काळजीपणा केल्यामुळे भार्गव सत्यनारायण गट्टपल्ली,वय-२४ वर्षे,रा.१-३१/१,नरसराव पेठ,जि.गंटुर,राज्य आंध्र प्रदेश हा पोहत असताना,तो पाण्यात बुडुन सदर इसम हे त्याचे मृत्युस कारणीभुत झाले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एस.एस.घोळवे ८८८८५४६११ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १६६/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | शितल परदेशी,वय-३७ वर्षे,रा.खडकी,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी महिला मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०३/२०१६ रोजी सकाळी १०/०० ते दि.१२/०५/२०१८ रोजी १८/०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद एक अनोळखी महिला मोबाईलधारक हिने तीचे मोबाईलवरून फिर्यादी यांना फोन करून,तुम्हाला युनायटेड किंगडम(यु.के.) हया देशातुन ज्वेलरी,लॅपटॉप आणि मोबाईल हया भेटवस्तु गिफ्ट म्हणुन पाठवित असल्याचा बहाणा करुन,त्या भेट वस्तुंच्या बदल्यात सदर अनोळखीचे महिलेचे खात्यावर एकुण २,२७,५००/- रुची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरिक्षक,(गुन्हे), ए.एस.लकडे ९८२२९०९२११ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २९३/१८,भादविक ४०९,४२० |
| **फिर्यादी** | संजीव नारखेडे,वय-५९ वर्ष,रा.पौड रोड,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | शालीवाहन मुंकुद सोलेगावकर,रा.आनंदनगर सिंहगड रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०१/२०१८ ते दि.१०/०५/२०१८ रोजीचे दरम्यान बँक ऑफ महाराष्ट्र शाखा,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा कोंढवा-बुद्रुक,पुणे येथील शाखा व्यवस्थापक नमुद इसम शालीवाहन मुंकुद सोलेगावकर हा सदर शाखेत नमुद कालावधीत बॅकींग ट्रान्झेक्शन व इव्हीव्हीएसचे काम करीत करताना,त्याचे पदाचा गैरवापर करून,सदर शाखेतील अधिका-यांचे पासवर्ड अनाधिकाराने वापरुन,स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी एकुण ७४ इंन्ट्रीजद्वारे इन्टरेस्ट पेड ऑन टर्म डिपॉझीट खात्यातुन एकुण ३०,९३,५००/- रुपये एका इसमाचे बँक ऑफ महाराष्ट्र सहकारनगर शाखा,पुणे येथील बचत खाते क्रमांकावर वर्ग करुन सदरची रक्कम परस्पर काढुन घेवुन,सदर रकमेचा अपहार करून,बँकेचे अर्थिक नुकसान करुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. के.के.कांबळे ९९२३१०७४५१ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २१६/१८,भादविक ३८५,३८६,३४ |
| **फिर्यादी** | मेहबुब अब्दुल कुरेशी,वय-३०,रा.जि.बारामती |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०५/२०१८ रोजी ०५/३० वा. नवले ब्रीज,वडगांव,सिंहगड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे चालकसहटेम्पो मध्ये मांस घेवुन मुंबईकडे घेवुन जात असताना, यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचा टेम्पो थांबवुन,तुमच्या गाडीत मांस भरले आहे असे सांगुन,त्यांना ५० हजार रुपयेची मागणी करून,ते दिले नाहीतर त्यांचा टेम्पो पेटवुन देवुन, फिर्यादीस जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सोनवणे ९८२२२८५८४८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**